# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**


**अंक २२/२०१९** **दिनांक १५/०३/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण**, विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग ९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे**, नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव**, तांत्रिक अधिकारी कृषिविदया विभाग ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९/०३/२०१९ ते १५/०३/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून २०/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/०३ | १०/०३ | ११/०३ | १२/०३ | १३/०३ | १४/०३ | १५/०३ | | १६/०३ | १७/०३ | १८/०३ | १९/०३ | २०/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.० | ३२.२ | ३५.० | ३२.२ | ३०.५ | ३०.४ | ३२.१ | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३३ | ३० | ३३ | ३२ |
| १३.० | १४.० | १३.५ | १५.० | १५.० | १५.५ | १४.६ | किमान तापमान (अं.से) | २० | १८ | १९ | १८ | १८ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | १ | २ |
| ८९ | ९१ | ९१ | ९० | ९० | ८३ | ७२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ४१ | ५३ | ४४ | ५९ | ६४ |
| ६० | ६३ | ६५ | ७० | ५९ | ७१ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २० | २१ | १८ | १९ | २४ |
| ४.१ | ४.१ | ४.५ | ५.७ | ४.८ | ५.२ | ५.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ४ | ४ | ३ | ५ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | वा.उ. | आ.द. | नै.द. | ई.उ. | आ.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १६ ते २० मार्च,२०१९ पर्यंत सापेक्ष आर्द्रतेमध्ये घट संभवते.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मध्यम ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फलधारणा अवस्था | • आंबा पिकामध्ये भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० **लिटर** पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• फळ वाटाणा आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन, फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची बटर पेपर किंवा कागदी पिशवी लावावी. |
| काजू | फलधारणा व पक्वता | • काजूमध्ये फळावर फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ टक्के प्रवाही २.५ मि. ली. किंवा थायेमेथॉक्झाम २५ टक्के २ ग्रॅम प्रति १० **लि. पाण्यात मिसळून** फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• काजू पिकामध्ये काही ठिकाणी काढणी योग्य बी तयार झालेली आहेत. तयार झालेल्या बिया बोंडापासून वेगळ्या करून बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवाव्यात. तसेच विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| सुपारी | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| मसाले पिके | काढणी | • तीन वर्षे वयाच्या दालचिनीच्या कलमाच्या सालीची पहिली काढणी करावी व पुढे एक ते दोन वर्षानंतर तयार फांद्याची काढणी करावी. झाड जमिनीपासून २० ते २५ से.मी. अंतरावर तोडावे. कापलेल्या फांद्यावरील तपकिरी रंगाची साल काढून सालीचे पट्टे काढलेल्या काठ्यावर पुन्हा बांधून तसेच पाने काढून सावलीत ४ ते ६ दिवस वाळवावीत व त्यानंतर सदर साल उन्हात दोन तास वाळवून हवाबंद डब्यात साठवावी. कापलेल्या भागाखालून येणाऱ्या नवीन फांद्या (४ ते ५ फांद्या) १ ते १.२५ मीटर लांबी व १ ते २ से.मी. जाडीच्या आणि खाकी रंगाच्या झाल्यावर पुढील तोडणी करावी. तोडणी करताना फांद्यावर दोन पेर ठेवावेत. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • उन्हाळी भेंडी पिकास गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• वांगी पिकाची काढणी फळे चमकदार व कोवळी असताना करावी. मिरची पिकामध्ये तयार हिरव्या मिरचीची काढणी करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रती दिन द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३०० ग्रॅम खुराक, ३ ते ४ किलो हिरवी वैरण व २ ते २.५ किलो वाळलेली वैरण प्रती दिन द्यावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा